
आजादी का
अमृत महोत्सव
तालुका विधी सेवा समिती कोपरगांव व वकीलसंघ कोपरगांव
यांच्या संयुक्त विद्यमाने


आज़ादी का अमृत महोत्सव
तालुका विधी सेवा समिती कोपरगांव व वकीलसंघ कोपरगांव
यांच्या संयुक्त विद्यमाने
अखिल भारतीय जनजागृती अभियान
(PAN India Awareness & Outreach Compaign)







# निरक्षरता संपवणे हा कायद्याचा उद्देश- न्या. पंडित

**कोपरगाव (तालुका प्रतिनिधी)**– निरक्षरता स्वतः ला व देशाला बाधक असते. त्यामुळे निरक्षरता संपवणे हा कायद्याचा उद्देश असून शिक्षण घेतलेले विद्यार्थी देखील कायद्याचे पालन करत नाही तसेच कायद्याची माहिती त्यांना नसते. माणूस मनाने विकसित होतो तेव्हा देशात विकास झालेला असतो. देशाला पुढे न्यायाचे असेल तर आपल्याला स्वतःत बदल करून सर्व नागरिकांना विधी साक्षर करणे गरजेचे असल्याचे मत वरिष्ठ अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी भगवान पंडित यांनी केले.

कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त. तालुका विधी सेवा समिती व वकील संघ- कोपरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती अभियान विधी सेवा व विधी साक्षरता पर जनजागृती अभियानात ते बोलत होते. यावेळी पोलीस निरीक्षक वासुदेव देसले, नामदेवराव पाटील, पाटील विधी महाविद्यालयाचे संस्थापक हिरालाल महानुभाव, जिल्हा सरकारी वकील अशोक वहाडणे, सहायक सरकारी अभियोक्ता सोमनाथ व्यवहारे, तालुका विधी सेवा समितीचे ॲड.अनुप ठोळे, ॲड.राहुल वाघचौरे, ॲड. शीतल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक भरत दाते, संजय पवार, गोपनीय विभागाचे राम खारतोडे, पोलीस नाईक अर्जुन दारकुंडे, तुकाराम तुपे, पोलीस कॉन्स्टेबल गणेश काकडे, प्रकाश कुंडारे, किशोर कुळधर, गणेश मैंड, यमनाजी सुंबे, श्रीकांत कुऱ्हाडे, गणेश थोरात, महिला पोलीस कॉन्स्टेबल अंजली भांगरे, डी. एड. कॉलेज प्राचार्या विजया थोरे, पुष्पांजली बोरावके, मंदा कदम, सायली शेलार, वृषाली गायकवाड, मणियार, सागर नगरकर, विधी महाविद्यालयाचे रेणुका सुरवसे, राहुल शिंदे, अविनाश गायकवाड, अविनाश कांबळे, कविता निकम, अमिता देवकाते, मनसेचे अनिल गाडे, बापू काकडे आदी उपस्थित होते. यावेळी हिरालाल महानुभाव म्हणाले, कायदेविषयक जनजागृती अभियान शासन व न्यायालय राबवत आहे.हा कार्यक्रम अत्यंत स्तुत्य असून कायद्याची माहिती प्रत्येक नागरिकाला होणे गरजेचे आहे. यासाठी न्यायालय व पोलीस ठाण्याला लागेल तेव्हा आमचे विधी विद्यालयातील विद्यार्थी आपल्या प्रत्येक उपक्रमात सहभागी असतील.

यावेळी पोलीस निरीक्षक देसले म्हणाले, ज्यांच्यावर खरोखर अन्याय होतो ते पोलीस ठाणे व कोर्टापर्यंत पोहचत नाहीत. मात्र काही अनावश्यक अनेक लोक पोलीस ठाण्यात येतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून कायद्याची माहिती व जनजागृती करण्याचे काम न्यायालय व शासनाच्यावतीने सुरू आहे. पोलीस कुठल्याही प्रकरणात पीडित व्यक्तीला न्याय देत खऱ्या बाबी न्यायालयात पोहचवण्याचे काम करत आहेत.



पंच लाईन

-रवी भागवत



अहो! ऐकलं का... पालिकेची नोटीस आलीय, आजच पाणीपट्टी भरली नाही तर दररोज मिळणारे दूषित पाणीही बंद केले जाईल...!

दिव्य मराठी
अहमदनगर सिटी 03-11-2022

# निरक्षरता संपवणे हा तर कायद्याचा उद्देश : पंडित

प्रतिनिधी | कोपरगाव शहर

निरक्षरता स्वतःला व देशाला बांधक असते. त्यामुळे निरक्षरता संपवणे हा कायद्याचा उद्देश असून, शिक्षण घेतलेले विद्यार्थी देखील कायद्याचे पालन करत नाही तसेच कायद्याची माहिती त्यांना नसते माणूस मनाने विकसित होतो. तेव्हा देशात विकास झालेला असतो, असे प्रतिपादन वरिष्ठ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी भगवान पंडित यांनी केले.

कोपरगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त तालुका विधी सेवा समिती व वकील संघ कोपरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय जनजागृती अभियान विधी सेवा व विधी साक्षरता पर जनजागृती अभियान आयोजित कार्यक्रमात वरिष्ठ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी भगवान पंडित बोलत होते. यावेळी वरिष्ठ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी भगवान पंडित, पोलिस निरीक्षक वासुदेव देसले, नामदेवराव पाटील विधी महाविद्यालयाचे संस्थापक हिरालाल महानुभाव, जिल्हा सरकारी वकील अशोक वहाडणे, सहायक सरकारी अभियोक्ता सोमनाथ व्यवहारे, तालुका विधी सेवा समितीचे ॲड. अनुप ठोळे, ॲड. राहुल वाघचौरे, ॲड. शीतल देशमुख, पोलिस उपनिरीक्षक भरत दाते, संजय पवार, गोपनीय विभागाचे राम खारतोडे, पोलिस नाईक अर्जुन दारकुंडे, तुकाराम तुपे, पोलिस कॉन्स्टेबल गणेश काकडे, प्रकाश कुंडारे, किशोर कुळधर, गणेश मैंड, यमनाजी सुंबे, श्रीकांत कुऱ्हाडे आदी उपस्थित होते.